**<u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्ग</u>**

मेट्रो-३च्या चार डब्यांचा दुसरा काफिला मुंबईत दाखल

मुंबई, ५ ऑगस्ट, २०२२ - कुलाबा-वांद्रे-सिपिज मेट्रो-३ मार्गाच्या पहिल्या ट्रेनसाठीचा चार डब्यांचा दुसरा काफिला आज पहाटे आरेतील सारीपूत नगर येथे दाखल झाला.

चार डब्यांचा दुसरा काफिला आंध्र प्रदेशातील श्रीसिटीहून मुंबईपर्यंत १,४०० कि.मी.चा पल्ला गाठत दहा दिवसांनंतर पोचला आहे. ४२ टन वजनाचा प्रत्येक डबा खास प्रकारच्या ट्रेलरवरून आणण्यात आला. या ८-ऐक्सेल ट्रेलर्सना ६४ चाकं असतात.

येत्या दोन दिवसात या डब्यांचीजुळवणी करून सारिपूत नगरातील तात्पुरत्या सुविधेमध्ये एक ट्रेन थाटली जाईल. येथेच चाचणी ट्रॅकसुद्‌धा उपलब्ध आहे. त्या नंतर तात्पुरत्या सुविधेपासून मरोळ नाका मेट्रो स्थनका पर्यंतच्या ३ कि. मी. लांबीच्या ट्रॅकवर ताबडतोब चाचण्या घेण्यास सुरुवात केली जाईल. (समाप्त)

**For further information please contact :-**

Niti Tamse

8369727364/9664215544

niti.tamse@mmrcl.com

Afreen Shaikh

8655533926

afreen.shaikh@mmrcl.com